**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ७५ दिनांक ०१/१०/२०२३**

# पालघर पोलीस दलाकडुन राबविण्यात आला "स्वच्छता अभियान" उपक्रम

भारताचे पंतप्रधान यांनी दि.०१ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता देशातील सर्व नागरीकांस एकत्रितपणे १ तास श्रमदानाचे आवाहन केले होते. त्याअनुषंगाने मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील जा.क्र.पोमसं/३६/र.व का. ८३००/८४/२०२० दि.२५/०९/२०२३ रोजी अन्वये राज्यातील सर्व पोलीस घटकात दि.०१ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता एकत्रितपणे १ तास श्रमदान करावे बाबत परीपत्रक प्राप्त झालेले होते.

पालघर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील सर्व पोलीस ठाणे हद्दिमध्ये पोलीस वसाहती, पोलीस ठाणे तसेच पोलीस मुख्यालय कार्यालये, उपविभागीय पोलीस कार्यालयांमध्ये स्थानिक महानगर पालिका, नगर परिषद, नगर पालिका यांच्या समन्वयाने दि.०१ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी आपआपले पोलीस ठाणे हद्दिमध्ये पोलीस ठाणेचे पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच शहर व ग्रामिण भागातील स्थानिक नागरीक, लोकप्रतिनीधी, शांतता कमिटी सदस्य, पोलीस पाटील, तटरक्षक दल, ग्रामरक्षक दल, मच्छिमार समिती, स्थानिक लोक प्राधिकरण कार्यालये, ग्रामपंचायत, शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थी यांचे उत्स्फूर्त सहभागातून सदरचे स्वच्छता अभियान यशस्वीपणे राबविण्यात आले.

मौजे शिरगाव येथील शिरगाव चौपाटी व शिरगाव किल्ला याठिकाणी श्री. गोविंद बोडके, जिल्हाधिकारी, पालघर, श्री. भानुदास पालवे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर, श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. पंकज शिरसाट, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्रीमती निता पाडवी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पालघर विभाग, श्री. संतोष राऊत, पोलीस उप अधीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, पालघर, श्रीमती संगिता शिंदे अल्फोन्सो, पोलीस उप अधीक्षक (गृह), पालघर यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेसह उपस्थित राहुन सदर ठिकाणी स्वच्छता अभियान राबविण्यात आले आहे.